**नियमित दिवाणी दावा १९०/२०१४ मधील नि.११४ खालील आदेश**

**(प्रल्हाद शंकर पाटील वि सुनिल दिनकर पाटील )**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादीने मयत प्रतिवादी यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर न घेतल्यामुळे झालेला अबेटमेंटचा हुकुम रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिदाव्यातील वादी यांचे म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र ४ हे दि. ०७.०८.२०२४ रोजी मयत झालेले असुन त्यांचे मृत्युपश्चात प्रतिदावा चालणेस कायदेशीर कारण उरत असुन प्रतिवादी क्र ४ यांना त्यांची पत्नी व २ मुले हे कायदेशीर वारस असुन प्रतिदाव्याचे कामी आवश्यक पक्षकार म्हणुन सामिल करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. परंतु त्यांची २ मुले ही प्रतिदाव्याचे कामी प्रतिवादी क्र १ व २ म्हणुन अलाहिदा रेकॉर्डवर आहेत. मयताचे सर्व वारस मुदतीत रेकॉर्डवर आणावे लागतात याची माहिती प्रतिदाव्यातील वादी यांना नव्हती. तसेच ते खेडेगावातील राहणारे असुन त्यांना कायदयाची माहिती नसल्याने व अल्प शिक्षीत असल्याने मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता आल नाहीत. वादींना वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर झालेला आहे. सदरचा प्रतिदावा प्रतिवादी क्र ४ यांचेविरुद्ध अबेट झालेला आहे. सदर अबेटमेंटचा आदेश रद्द न झाल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होऊन त्यांच्यावर अन्याय होणार आहे. सबब अबेटमेंटचा हुकुम रद्द होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रास्ताविक वारसांनी त्यांचे म्हणणे **(नि.१२८)** दाखल केले असुन त्यात त्यांनी सदरचा अर्ज व त्यामधील मजकुर खोटा व लबाडीचा असल्याने तो नामंजुर करण्यात यावा असे सांगितले आहे. प्रतिवादी क्र ४ हे दि. ०७.०८.२०२४ रोजी मयत झालेले असुन त्यांचे वारस ९० दिवसांचे आत त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक होते. परंतु वादी यांनी मुदतीत अर्ज दाखल केलेला नसल्याने व विलंबाचे कारण अस्पष्ट नमुद केलेले आहे. वादीचा अर्ज योटा व लबाडीचा असल्याने अर्ज नामंजुर करणेत यावा असे सांगितले आहे. यदाकदाचित न्यायालय अर्ज मंजुर करणेच्या निष्कार्षास आल्यास प्रत्येकी र.रु. १,०००/- इतकी कॉस्ट करावी अशी विनंती केली आहे.

४. वादीने सदरचा दावा प्रतिवादीविरुद्ध दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप करुन मागणेसाठी दाखल केलेला आहे. वादीने मयत प्रतिवादी क्र ४ दिनकर शंकर पाटील याचा मृत्युचा उतारा **(नि.११९/१)** दाखल केला असुन त्यावरुन तो दि. ०७.०८.२०२४

रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास वादीस साधारणतः ४१ दिवसांचा उशिर झालेला आहे. असे असले तरी अर्जातील कथनांचा विचार करता व दाव्याच्या निर्णयाकरीता सदर अबेटमेंटचा आदेश रद्द करणे न्यायोचित होईल. सबब मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज **(नि.११४)** मंजूर करणेत येतो.

२. वादीने नि. ११२ वरील खर्चाची रक्कम प्रास्ताविक प्रतिवादींना अदा केल्यानंतर अबेटमेंटचा आदेश रद्द होईल.

Digitally signed by PRAJAKTA GAJANAN SHELAR
Date: 2025.03.10 17:30:03 +0530

स्थळ : कराड ( पी.जी.शेलार )

दिनांक :– १०.०३.२०२५ ६वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कराड.